**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
**महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी**
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
दूरध्वनी : ०२२-२६६७७५५५,
Website: www.mahafireservice.gov.in Email : supdt@mahafireservice.gov.in

**क्र.मअसे/३/२०१८/ १०९३** **दिनांक : २७/०७/२०१८**

## अग्निशामक पदासाठी आवश्यक असणा-या अटी व शर्ती

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई येथील **अग्निशामक गट ड**, वेतनश्रेणी रु.५२००-२०,२०० ग्रेड पे रु.१,८००/- मधील दोन पदे अनुक्रमे खुला व इतर मागास वर्ग या प्रत्येंकी एक प्रवर्गातून भरण्यासाठी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असलेल्या इच्छुक व पात्र फक्त पुरुष उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहे. या पदासाठी आवश्यक असणा-या अटी व शर्ती व अर्जाचा नमुना खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पदाचे नांव व पदसंख्या | : अग्निशामक गट ड, एकूण २ पदे |
| आरक्षण | : खुला प्रवर्ग (ओपन ) — १ पद<br>इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.) — १ पद |
| वय | : खुला प्रवर्ग — १८ ते ३० वर्षे<br>इतर मागास वर्ग (ओ.बी.सी.) — १८ ते ३५ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | : किमान १० वी उत्तीर्ण |
| तांत्रिक अर्हता | : महाराष्ट अग्निशमन सेवा अकादमीचा (राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई) ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण व एमएससीआयटीं परीक्षा उत्तीर्ण. |
| किमान शारीरिक पात्रता | : उंची १६५ सें.मी. (किमान)<br>वजन ५० किलो (किमान)<br>छाती ८१ सें.मी. (सर्वसाधारण) ८६ सें.मी. (फूगवून)<br>(किमान ०५ से.मी.छाती फुगविणे आवश्यक आहे).<br>दृष्टी — चांगली<br>अग्निशमन सेवेत ऑपरेशनल कामामसाठी उमेदवाराची निरोगी व सदृढ शरीरयष्टी असावी. |
| भाषेचे ज्ञान | : मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| अर्ज करण्याची शेवटची तारीख | : १४.०८.२०१८ |

सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यानुसार पूर्ण भरलेला अर्ज शैक्षणिक/तांत्रिक/वय/जातीचा दाखला (फक्त ओ.बी.सी.उमेदवाराकरीता)/रहिवाशी दाखला इत्यादी कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतीसह स्वसाक्षांकींत करुन दि.३०.०७.२०१८ ते १४.०८.२०१८ पर्यंत महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, हंस भुग्रा मार्ग, विदयानगरी, सातांक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८ या पत्त्यावर जमा करावेत. अर्जाच्या पाकीटावर **अग्निशामक पदासाठी अर्ज** असा स्पष्ट उल्लेख करावा.

**वरील पदाची भरती प्रक्रिया स्थगित करणे व रदद करणे याबाबतचे सर्व अधिकार संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा स्वतःकडे राखून ठेवीत आहे.**

( प्र.सु.रहांगदळे )
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा.

# अर्जाचा नमुना

*अलीकडील पासपोट आकाराचा रंगीत फोटो चिटकवून स्वाक्षरी करावी.*

प्रति,
मा.संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
हंस भुग्रा मार्ग, विदयानगरी,
सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८.

विषय : **अग्निशामक गट ड** या पदासाठी अर्ज करण्याबाबत.

महोदय,

दैनिक वर्तमान पत्रातील आपल्या जाहिरातीस अनुसरुन अग्निशामक गट ड या पदासाठी मी अर्ज करण्यास इच्छुक आहे. माझी शैक्षणिक पात्रता, तांत्रिक अर्हता, जन्मतारीख इत्यादीबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव :

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :

३. भ्रमणध्वनी क्रमांक :

४. जन्मतारीख व वय :

५. धर्म व जात :

६. शैक्षणिक पात्रता :

७. तांत्रिक पात्रता :

८. अनुभव (असल्यास) :

९. शारीरिक पात्रता : उंची : सेमी वजन कि.ग्रॅ.
छाती: सेमी (न फुगवता)
सेमी (फुगवून)

१०. अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती :

मी या अन्वये असे जाहिर करतो की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज अपात्र ठरविल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर झाली उमेदवारी रदद केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची सही :

संपूर्ण नांव :